# मूल्य शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास – तंत्रज्ञान आणि वास्तविक परीस्थिती

**डॉ. क्षमा चव्हाण**
गृहअर्थशास्त्र विभाग
महिला महाविद्यालय नंदनवन नागपूर
kshamadchavhan@gmail.com
9423680261

---

***सरांश***

*शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील आवश्यक पैलू आहे. शिक्षण ही एक प्रक्रिया आहे जी एका आईच्या गर्भातून सुरू होते अणि एखादया थडग्यात संपते या म्हणी नुसार शिक्षण महत्त्वाचे आहे. शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान आणि माहिती देणे नव्हे, तर मानवाचे चरित्र निर्माण करणे होय. मूल्ये आणि आदर्शांचा समुह असणाऱ्यांनी आत्म विकासाकरिता मार्गदर्शन केले पाहिजे. विदयार्थी विकासासोबतच व्यक्तीद्वारे समाज विकास होईल आणि राष्ट्र सर्व दृष्टीने संपन्न होईल असे शिक्षण मिळणे गरजेचे आहे. भारत सरकारने टाकलेले पाऊल स्वागतार्ह आहे. असे म्हणावयास हरकत नाही. देशात तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणामुळे शिक्षण व्यवस्था खूप वेगाने बदलत आहे. विदयार्थ्यांसाठी येणारा काळ हा तंत्रज्ञानावर आधारीत डिजीटल तसेच ऑनलाईन शिक्षणाचा दिसून येत आहे.*

---

*Keyword* - शिक्षण , सर्वांगिण विकास, मुल्यशिक्षण, तंत्रज्ञान

**प्रस्तावना :**

शिक्षण म्हणजे समजणे शिक्षण म्हणजे स्वत: विचार करणे, शिक्षण म्हणजे समाजासाठी जीव तुटणे, शिक्षण म्हणजे कष्ट करू शकणे, शिक्षण म्हणजे चांगले माणूस होणे, शिक्षण म्हणजे संकुचितपणा नष्ट होणे, शिक्षणाने माणसाचे चरित्र घडायला पाहिजे. परंतु आज आपण विद्यार्थ्यांना चंगळवादी, टी व्ही वादी बनवतो आहे आणि हे थांबविणे गरजेचे आहे. कारण शिक्षण म्हणजे काय हेच आपण विसरलो आहे. आपण हे विसरलो की शिक्षणाचा खरा अर्थ समाजासाठी जोडले जाणे समाजासाठी जीव तुटणे, शिक्षण म्हणजे पर्यावरणाचा प्रश्न कळणे, शिक्षण म्हणजे स्वावलंबी होणे. शिक्षण म्हणजे चांगले माणूस होणे असे शिक्षण सदयपरिस्थीतीत दिसून येत नाही.

शैक्षणिक अभ्यासक्रमात प्रत्येक विद्यार्थ्यास त्यांच्यातील विशिष्टतेसह सरेखीत करण्यासाठी जगातील आपले स्थान शोधण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे हे साध्य करण्यासाठी विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास अतीशय महत्वाचा आहे. आपण प्रत्येक व्यक्तीला शैक्षणिकदृष्टया सशक्त असल्याचे बघता तरी देखील फार थोडया लोकांचे मुल्यवान शिक्षण असू शकेल. संतुलीत व्यक्तिमत्व विकसित करण्यामध्ये मुल्य शिक्षणाचे महत्व वर्षानुवर्षे वाढत आहे. शिक्षकाप्रमाणे पालक म्हणून ही महत्वपूर्ण जबाबदारी आहे की, आपल्या मुल्यांना वास्तविक जगात टिकवून ठेवण्यासाठी केवळ त्यातच भरभराट होण्यासाठी कौशल्य विकसित करणे महत्वाचे आहे. करीयर निवडणे ,भविष्याची तयारी यासारख्या विविध बाबींवर विचार करणे खूप आवश्यक आहे. तरूण विदयार्थ्यांमध्ये मुल्यांचा ऱ्हास होणाबददल चिंता वाढत आहे आणि शिक्षणाद्वारे त्यांचे सबली करण करण्याची आज गरज निर्माण आहे. मुल्यशिक्षण म्हणजे अशा शिक्षण शास्त्राचा संदर्भ आहे जे शिक्षण विदयार्थ्यांना समृद्ध करणारे अनुभव तयार करण्यासाठी वापरतात.

चारित्र्य निर्मितीत सहकार्य करतात विद्यार्थ्यांना वैज्ञानिक पद्धतीची जोड देवून स्वयं अध्ययनास प्रवृत्त करणे महत्वाचे आहे. अशा मुल्यांचा शिक्षण प्रणालीत चांगला परिणाम होतो. यावरून असे लक्षात येते की, मुल्यशिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा समग्र दृष्टीकोन बदलतो आणि विदयार्थ्यांना सुखी समाधानी आणि यशस्वी जीवन जगण्यास सक्षम करते विदयार्थांचा शारीरिक, मानसिक सौंदर्याचा नैतिक आणि अध्यात्मिक घटकांचा विकास म्हणजे सर्वांगिण विकास होय.

शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान आणि माहिती देणे नव्हे तर मानवाचे चरीत्र निर्माण करणे होय. मुल्ये आणि आदर्शाचा समुह असणाऱ्यांनी आत्म विकासाकरीता मार्गदर्शन केले पाहिजे. जेणेकरून मुल्ये हे त्यांचा भाग बनेल बालक आण्णि तरूणावस्थत चारीत्र्य मोठया प्रमाणात साकारले जात असल्याने शैक्षणिक संस्थांची ही जबाबदारी आहे की विद्यार्थ्यांचे चारीत्र्य घडेल असेच शिक्षण दयावे.सध्या जग खूप वेगाने विकसित होत आहे. म्हणून सहसंयम आणि ऐक्य व सहकार्याची मुल्ये जोपासण्याची त्वरीत गरज आहे. सुसंवादातून शिक्षणाद्वारे उत्तम प्रकारे विकसित करता येवू शकते. पर्यावरणाच्या संरक्षणाविषयी अलीकडील काळातील चिंतेमुळे असा विचार केला. सद्यपरीस्थीती तरूणांमध्ये विकृती वाढलेली आहे. याकरिता विदयार्थ्यांना शिस्त आदर, आत्मनियंत्रण आणि शांततेचे मुल्ये शिकविणे गरजेचे आहे.

आपल्या भारतीय राज्य घटनेत स्वातंत्र्य, समता, बंधुत्व हे आदर्श देणे गरजेचे आहे. देशप्रेम, अहिंसा, सुसंवाद, आणि समान बंधूतेच्या भावनेचा प्रचार विकास, वैज्ञानिक दृष्टीकोन, चिकीत्सक स्वभाव ,सुसंवाद व समान बंधूतेच्या भावनांच्या प्रसाराच्या माध्यमाने वैयक्तिक आणि सर्वच क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट ते कडे अथवा गुणवत्तेकडे जाण्याकरीता एकत्रीत प्रयत्न होणे गरजेचे आहे. चांगले विदयार्थी घडविण्यासाठी व आलेल्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी विशेष कौशल्य विकसित केल्यास विदयार्थ्यांमध्ये आमुलाग्र बदल घडून येवू शकतो. स्वामी विवेकानंदांच्या मते – ''खरे शिक्षण हे मानव निर्मित आहे. आज शैक्षणिक मुल्य हे शिक्षणातुनच निर्माण होते.'' याकरीता मुल्य शिक्षण खूप महत्वाचे आहे. गुरूकुल पद्धतीत या शिक्षणाला विशेष महत्व होते. परंतु जसा जसा वैज्ञानिक व तांत्रिक विकास होत गेला एका क्लीक वर संपूर्ण जग आपल्या समोर उभे राहीले आहे. विदयार्थी शिक्षकामधील अंतर वाढत आहे म्हणून हे अंतरही कमी होणे आवश्यक आहे.

मानसिक गुणांचे संवर्धन आणि दोषांचे उच्चाटन जे करते ते शिक्षण. विदयार्थ्यांचा सर्वांगिण विकास करून घेण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान म्हणजे शिक्षण. आजचे शिक्षण हे पुस्तकी स्वरूपाचे आहे पुस्तकी माहिती ठरावीक वेळेत पुन्हा उतरवून काढणे या पद्धतीला आजकाल परीक्षा म्हटले जाते. पुस्तकाबाहेरील कोणत्याही गोष्टीचा विचार करण्याची मुभा विदयार्थी किंवा शिक्षकांना नसते त्यामुळे विदयार्थ्यांची स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता नष्ट होत आहे. स्वत:च्या बुद्धीचा वापर करण्याची संधी न मिळाल्याने विदयार्थ्यांची गुणवत्ता कळू शकत नाही. पदव्यांना अवास्तव महत्व प्राप्त होवून त्या मिळविण्यासाठी जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. या कारणामुळेच वैदयकीय, अभियांत्रिकी तसेच इतर शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रवेश मिळविणे खूप कठीण झालेले आहे. दिवसेंदिवस महाविदयालयातून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांची संख्या वाढत आहे. आणि त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा दर्जा घसरत आहे. आज वाढत्या औदयोगिकीकरणाच्या परीस्थीतीत व्यवसाय भिमुख आणि प्रात्यक्षिकावर आधारित शिक्षणाची खूप निकडीची गरज आहे. परंतु आज ती पूर्ण होत नाही. पुस्तकी शिक्षणावर जास्त भर दिला जातो.

व्यक्ती विकासाचा उददेश डोळयासमोर ठेवल्यास नृत्य, गायन, शिल्पकला इत्यादी कलाविभागांचा ही शिक्षणात अंतर्भाव करून विदयार्थ्यांचे कौशल्य विकसीत व्हावे. शारीरिक बौद्धिक, भावनिक असा सर्वंकष

विकास साधण्यासाठी शिक्षण पद्धतीत आमुलाग्र परीवर्तनाची गरज आहे. रोजगार मिळवून देणारे, स्वयंव्यवसायाला प्रेरीत करणारे, सुसंस्कार घडवणारे, स्वदेश ,स्वभाषा स्वदेशबांधवाच्या विषयी नितांत अभिमान निर्माण करणारे हे शिक्षण असावे.

विदयार्थी विकासासोबतच व्यक्तीद्वारे समाज विकास होईल आणि राष्ट्र सर्व दृष्टीने संपन्न होईल असे शिक्षण मिळणे गरजेचे आहे. भारत सरकारने टाकलेले पाऊल स्वागतार्ह आहे. असे म्हणावयास हरकत नाही. आजच्या शिक्षण पद्धतीतून विदयार्थी सुशिक्षित होतो परंतु तो सुजाण सुसंस्कृत होतोच असे नाही वास्तविक शिक्षण हा पवित्र संस्कार आहे. शिक्षण घेतलेली व्यक्ती सुसंस्कृत असायला हवी परंतू दुदैवाने तसे दिसत नाही. विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे गरजेचे आहे. म्हणुनच शिक्षणप्रणालीत मुल्यवर्धीत शिक्षणाची गरज आहे गुरूकुल पद्धतीच्या शिक्षण प्रणालीत मुल्य शिक्षणाला विशेष महत्त्व होते.

देशात तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणामुळे शिक्षणव्यवस्था खूप वेगाने बदलत आहे. विदयार्थ्यांसाठी येणारा काळ हा तंत्रज्ञानावर आधारित डिजीटल तसेच ऑनलाईन शिक्षणाचा दिसून येत आहे. मानवी जीवनात ज्ञान, कौशल्य आणि समजूतदारपणा आणण्यात शिक्षणाचा मोलाचा वाटा आहे. शिक्षण लोकांना चांगले नागरिक बनविण्यास शिकविते मातीच्या गोळयाला खडूपासून, धूळपाटया, लाकडीपाटया, ब्लॅकबोर्ड, ग्रीनबोर्ड, व्हाईट बोर्ड ते डिजीटल बोर्ड पर्यंत शिकविण्याच्या साधनांचा विकास झालेला आहे. त्यासोबतच अध्यापन पद्धतीतही बदललेल्या आहे. आज आपण डिजीटल आणि ऑनलाईन शिक्षणप्रणालीच्या क्षेत्रात प्रवेश करीत आहोत, पण या पद्धतीने मुळे शिक्षणाची संकल्पना मागे पडत आहे. विद्यार्थ्यांसमोर उभे राहून शिकविण्यात जो संवाद, एकमेकांच्या चेहऱ्यावरील हावभाव व्यक्त होत होते. ते शिक्षक आणि विद्यार्थी दोघांच्याही फायदयाचे व गरजेचे होते. गृहपाठ देणे, तपासणे हे परीक्षेच्या दृष्टीनेही महत्वाचे होते.

शिक्षण विदयार्थी व पालक यांच्यातील एकमेकांमधला सुसंवाद विदयार्थ्यांच्या प्रगतीकरिता कारणीभूत होता. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकासाकरिता विविध स्पर्धा, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम यातून विदयार्थ्यांमध्ये कलेची आवड जोपासली जाते. सोबतच भारतीय संस्कृतीची ओळख, संस्काराचे घडे हे शाळा ,महाविदयाल्यातील रोजच्या उपस्थिती मुळे विदयार्थ्यांना मिळतात म्हणून शाळा महाविद्यालय हे सर्व आदर्श विदयार्थी , नागरिक घडविण्याचे एक दालन आहे व प्रयत्न होत आहे. परंतु सध्याची वास्तविक परीस्थिती (कोरोना काळात) विदयार्थ्यांचे शिक्षण खूप प्रभावित होत आहे. मोबाईल हे प्रत्येक विदयार्थ्यांजवळ नसतात. रेग्युलर वर्ग घरात एकच मोबाईल असल्यामुळे होवू शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे ऑनलाईन वर्ग राहून जातात. वर्ग करणाऱ्या वियार्थ्यांचे प्रमाण खूप कमी झाले आहेत.

शिकविलेले विद्यार्थ्यांना किती समजले हे कुणाला सांगणार ? हा ही एक मोठा प्रश्न आहे. सततच्या मोबाईलच्या वापराने मोबाईलच्या प्रखर लहरीने दृष्टीदोष होणाचा धोका वाढत आहे. नेटप्रॉब्लेम, रिर्चाज चा खर्च, या सर्व बाबींचा विचार होणे महत्वाचे आहे.म्हणून नवीन तंत्राचा उपयोग करीत मुल्यवर्धीत शिक्षणाच्या माध्यमाने विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## संदर्भ


- लोकसत्ता – 4 जुलै 2015
- www krushival in >raigad>other
- M.Facebook.com>post
- https:enwikipedia org /wiki/Holistic education
- https://idremcareer.com/blog/holistc.dadoprnet
- https://www holistic-educationnet/articals/values.pdf